## कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्ग

### मुं.मे.रे.कॉ व जायका यांच्या संयुक्त विद्यमाने कामगारांना स्वच्छतेशी निगडित वस्तूंचे वितरण

**मुंबई, २ ऑक्टोबर, २०२१ :** महात्मा गांधी जयंती निमित्ताने, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (मुं.मे.रे.कॉ) द्वारे जपान इंटरनॅशनल कॉ-ऑपरेशन एजन्सी (जायका) यांनी प्रदान केलेल्या स्वच्छतेशी निगडित वस्तू, माहिती व संवाद साहित्याचे वितरण करण्यात आले. हा कार्यक्रम मुं.मे.रे.कॉच्या कार्यालयात श्री. रणजित सिंह देओल, व्यवस्थापकीय संचालक; श्री. आर. रमणा, कार्यकारी संचालक (नियोजन), मुं.मे.रे.कॉ; श्री. नागाई शिंसुके, वरिष्ठ प्रतिनिधी आणि श्री. तगुची युसुके, प्रतिनिधी, जायका यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

कोविड -१९ सह संसर्गजन्य रोगांचा प्रसार रोखण्यासाठी स्वच्छतेच्या सवयी अंगीकारण्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी जायकाने " अच्छी आदत" नावाने मोहीम सुरू केली आहे. या उपक्रमाचा उद्देश वैयक्तिक स्वच्छतेच्या सवयी जसे हात धुणे, नखं स्वच्छ ठेवणे तसेच योग्य प्रकारे मास्क घालणे याविषयी जागरूकता निर्माण करणे आहे. या उपक्रमांतर्गत जायका द्वारे मुंबई मेट्रो लाइन -३ प्रकल्पामधील बांधकाम स्थळांवरील फ्रंट-लाइन कामगारांना स्वछतेशी निगडित साहित्याचे वाटप करण्यात आले.

''जायका द्वारे आयोजित 'अच्छी आदत' उपक्रम स्वच्छतेच्या चांगल्या सवयी अंगीकारण्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी एक उत्कृष्ट पाऊल ठरेल. विशेषतः कोविड -१९ च्या महामारी काळात, रोगांना दूर ठेवण्यासाठी स्वच्छतेचे पालन करणे अत्यावश्यक आहे. या उपक्रमामध्ये भाग घेण्याची संधी दिल्याबद्दल आम्ही जायकाचे आभारी आहोत.'' असे मुं.मे.रे.कॉ.चे व्यवस्थापकीय संचालक, श्री. रणजित सिंह देओल म्हणाले.(समाप्त)

For further information please contact: -

Vaidehi More
9028543087
vaidehi.more@mmrcl.com

Niti Tamse
8369727364/9664215544
niti.tamse@mmrcl.com